Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Rights

# दातांची ओळख

डाउनटाउन बॉस्टनमध्ये हिंडताना मला माझा डेंटिस्ट भेटला.

मी म्हणाले त्याला,

“ओळखले का तुम्ही मला ?

मी ललिता, तुम्ही माझ्या दातांचा ब्रिज केला.”

थोडा विचार करून तो म्हणाला,

“उघडून दाखव तुझं तोंड मला !”

माझे दात बघताच ओळख पटली त्याला.

“हाय ललिता, ओळखले मी तुला” तो म्हणाला.

मग माझ्या मनात विचार आला,

“चार वर्षे झाली अपेंडिक्स काढलेल्याला.

परत जर तो सर्जन भेटला,

तर त्याला ओळख पटवायला उघडून दाखवावं लागणार कां पोट मला ?”

पूर्वप्रसिद्धी एकता १९७९-१९८२